## प्रेस नोट दिनांक २७/०२/२०२४

## सोलापूर शहर गुन्हे शाखेकडून, चोरीचे ०६ गुन्हे उघडकीस आणून, ०१,९०,०००/- रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त.

---

सोलापूर शहरामध्ये गर्दीचा फायदा घेऊन, महिलांचे गळयातील मंगळसुत्र चोरीचे गुन्हे घडलेले होते. त्याचप्रमाणे, सोलापूर शहरातील मोटार सायकल चोरीचे गुन्हे, असे दोन्ही प्रकारचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत, मा. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त सोलापूर शहर, डॉ. दीपाली काळे, पोलीस उप- आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, यांनी गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन केले होते.

अ) त्याप्रमाणे, श्री. सिध्देश्वर यात्रा, होम मैदान येथील गड्डा यात्रेमध्ये, एका महिलेच्या गळयातील मंगळसुत्राची चोरी करून, ते चोरीचे मंगळसुत्र घेवून एक महिला ही, विक्री करीता सोलापूर मध्ये येणार असल्याची गोपनिय माहिती, सपोनि/जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथकास प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने सपोनि/ जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथक असे मिळालेल्या माहितीच्या प्रमाणे, एक विधिसंघर्षीत मुलगी, कालीका माता मंदिरच्या समोरुन जात असताना मिळुन आली. तिला महिला पोलीस अंमलदार मपोना/१४२६ तांबोळी यांनी ताब्यात घेऊन, तिचेकडे अधिक विचारपूस केली असता, तिने **दि.२१/०१/२०२४ रोजी** सायंकाळी ०७.०० वाजता सिध्देश्वर यात्रेमधील, होम मैदान या ठिकाणी, एका महिलेच्या गळयातील मंगळसुत्र चोरी केले बाबतची कबुली दिली. सदरचे **०५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे चोरीचे मंगळसुत्र, किंमत रू.२०,०००/-** हे त्या विधीसंघर्षीत मुलीकडे मिळुन आल्याने, ते जप्त करणेत आले आहे. त्याबाबत **सदर बझार पोलीस ठाणे गु.र.नं.५२/२०२४ भा.द.वि.क.३७९ अन्वये दाखल असलेला गुन्हा उघडकीस आला आहे.**

ब) तसेच गुन्हे शाखेकडील गुन्हे शाखेकडील सपोनि/ जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथक यांनी, सोलापूर शहरातील, मोटार सायकल चोरीचे गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन, बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीचे आधारे, खालील नमूद तक्त्याप्रमाणे- आरोपी नामे- **१)** अरबाज मेहबुब शेख, वय-२४ वर्षे, राहणार- शास्त्री नगर अंन्सारी चौक, सोलापूर याचेकडून, चोरीचे ०२ मोटार सायकल, **२)** श्रीराम खुबराम यादव वय- २९ वर्षे, राहणार- मु. तुलसीपुर, पो. भरावन, थाना संधिला, जि. हरदोई, राज्य- उत्तर प्रदेश याचेकडून चोरीचे ०२ मोटार सायकल, **०३)** सुर्यकांत आप्पाराव हेलगर वय- ३९ वर्षे, व्यवसाय- ट्रक ड्रायव्हर, राहणार- घ.नं.२१२ भवानी पेठ, सोलापूर, सध्या जयप्रकाश नारायण नगर, मुळेगांव रोड सोलापूर याचेकडून चोरीची ०१ मोटार सायकल, **असे एकूण ०३ आरोपींकडुन, १,७०,०००/- रुपये किंमतीचे एकुण ०५ मोटार सायकल जप्त करून, ०५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.** त्यामध्ये, सोलापूर शहरातील ०३ मोटार सायकल चोरीचे गुन्हे, सोलापूर ग्रामीण मधील ०१ मोटार सायकल चोरीचा गुन्हा आणि धाराशिव जिल्ह्यातील ०१ मोटार सायकल चोरीचा गुन्हा असे ०५ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुरनं व कलम | मोटार सायकल क्रमांक | आरोपीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | सदर बझार | गु.र.नं.९७/२०२४ भादवि ३७९ | MH13 DH 2082 हिरो एच. एफ. डिलक्स | श्रीराम खुबराम यादव वय- २९ वर्षे, राहणार- मु. तुलसीपुर, पो. भरावन, थाना संधिला, जि. हरदोई, राज्य- उत्तर प्रदेश |
| २ | तालुका सोलापूर ग्रा. | गु.र.नं.१०९/२०२४ भादवि ३७९ | MH13 DS 2105 सुझुकी ॲक्सेस १२५ | श्रीराम खुबराम यादव वय- २९ वर्षे, राहणार- मु. तुलसीपुर, पो. भरावन, थाना संधिला, जि. हरदोई, राज्य- उत्तर प्रदेश |
| ३ | जेलरोड | गु.र.नं.६६/२०२४ भादवि ३७९ | MH-13 DJ 5339 HF-Delux | सुर्यकांत आप्पाराव हेलगर वय- ३९ वर्षे, व्यवसाय- ट्रक ड्रायव्हर, राहणार- घ.नं.२१२ भवानी पेठ, सोलापूर, सध्या जयप्रकाश नारायण नगर, मुळेगांव रोड सोलापूर |
| ४ | सदर बझार | गु.र.नं.८९/२०२४ भादवि ३७९ | MH13CM 1907 Hero Duet | अरबाज मेहबुब शेख वय-२४ वर्षे, राहणार- शास्त्री नगर अंन्सारी चौक, सोलापूर |
| ५ | तामलवाडी जि. धाराशिव | गु.र.नं.११२/२०२१ भादवि ३७९ | MH25 AT 6854 Hero युनिकॉन | अरबाज मेहबुब शेख वय-२४ वर्षे, राहणार- शास्त्री नगर अंन्सारी चौक, सोलापूर |

सदरची कामगिरी, मा. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त सोलापूर शहर, डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. सुनिल दोरगे, व.पो.नि., गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि/ जीवन निरगुडे, पोलीस अंमलदार सफौ/ दिलीप किर्दक, वाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, सतिश काटे, बाळु काळे, अविनाश पाटील, प्रकाश गायकवाड, महिला पोलीस अंमलदार तांबोळी व लंगोटे यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करीता.**

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner